# सुखशांती को.-ऑप हौसिंग सोसायटी लि.

रजि.नं. एनबीओएम./ सिडको / एचएसजी.(ओएच)/ ७५२ / जेटीआर /१९९८-९९

सेक्टर -९, बिल्डींग नं. डी-१ ते डी-१०, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९.

संदर्भ क्र. ३२५/२०२५ दिनांक ०१/०४/२०२५

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरिता)**

सुखशांती को-ऑप हौसिंग सोसायटी लि. च्या सर्व अधिकृत सभासदांना कळविण्यात येते कि, सोसायटीची विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०९/०४/२०२५ रोजी संध्याकाळी ठीक ०७:०० ते १०:०० वाजता **न्यु बॉम्बे झोरॅष्ट्रियन असोसिएशन चॅरिटेबल ट्रस्ट हॉल, पहिला मजला, प्लॉट नं. १४/२, सेक्टर -९, कालिकामाता मंदिरासमोर, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०९**. या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सोसायटीस सहकार्य करावे हि नम्र विनंती.

**-:सभेपुढील विषय:-**

१. मागील दिनांक १६/०२/२०२५ रोजीच्या सोसायटीच्या पुनर्विकासासंबंधीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे व सोसायटीच्या दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या प्रेझेंटेशन सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. सुखशांती को-ऑप हौसिंग सोसायटी लि. च्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी निवडलेल्या तीन विकासकांकडून मागविण्यात आलेले सीलबंद अंतिम निश्चित प्रस्ताव (No Regret Offer) उघडणे.

ठिकाण : कोपरखैरणे

दिनांक : ०१/०४/२०२५

**टीप:-**

१. सभेसाठी गणसंख्या नसेल तर सभा अर्ध्या तासासाठी तहकूब केली जाईल आणि अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी विषय पत्रिकेतील विषयावरती सभा घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. सोसायटीचे पीएमसी, श्री. सागर संघवी ( मे. दिलीप संघवी कन्सल्टंट्स ) आणि कायदेविषयक सल्लागार यांना सभेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

३. सभेसाठी फक्त प्रथम नाव असणारे सभासद सभेस उपस्थित राहू शकतात. त्यांचे सहसभासद उपस्थित राहणार असल्यास, प्रथम सभासदाचे अधिकृत पत्रासह आणि प्रथम सभासदाच्या अनुपस्थितीत हजर राहू शकतात.

४. सर्व सभासदांनी आपणास सोसायटीने दिलेले ओळखपत्र गळ्यात घालून सभेस उपस्थित राहावे.

सुखशांती को-ऑप हौसिंग सोसायटी लि. नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी(ओएच) / ७५२ / जेटीआर / सन १९९८-९९ ★ नवी मुंबई ★

**सुखशांती को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.**

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**